YF-25

(नॅक अ+दर्जा )

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक

### विद्यापीठ स्मृतीचिन्ह व चषकांची रचनात्मक, नावीन्यपूर्ण, कल्पना कलात्मक मुक्तस्पर्धा

### स्पर्धेचे स्वरुप व नियम

| अ.क्र. | विवरण | लांबी | रुंदी | उंची | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ स्मृतीचिन्ह | १० इंच | ४.५ इंच | १५ इंच | विद्यापीठाचे नाव लोगो आवश्यक ( डिझाईनचे टेक्स मराठी भाषेत) |
| २. | विद्यापीठ चषक | ८ इंच | ८ इंच | १८ इंच | विद्यापीठाचे नाव लोगो आवश्यक (डिझाईनचे टेक्स मराठी भाषेत) |

१. सदरील स्पर्धेचा कलावधी १८ जुलै २०२५ ते १० ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे.

२. प्रवेशिका (डिझाईन - रंगीत) पाठविण्याचा अंतीम दिनांक १०/८/२०२५

३. सदरील स्पर्धा सर्वांसाठी खुली असून यामध्ये विद्यार्थी, कलावंतर, व्यावसायिक इ. सहभाग नोंदवू शकतात.

४. प्रत्येक स्पर्धकाला उपरोक्त दोन्ही कलाप्रकारासाठी जास्तीत जास्त दोन प्रवेशिका (डिझाईन) पाठविता येतील.

५. स्मृतिचिन्ह स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे प्रथम रु. ५०००/- , व्दितीय रु. ३०००/- , तृतीय रु. २०००/- आणि चषक स्पर्धेत अनुक्रमे प्रथम रु. ३०००/- , व्दितीय रु. २०००/- , तृतीय रु. १०००/- पारितोषिक दिले जाईल. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना विद्यार्थी विकास विभागाव्दारे सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.

६. स्पर्धेसाठी प्राप्त प्रवेशिका (डिझाईन), पारितोषिक प्राप्त प्रवेशिका (डिझाईन) वापरायचे, त्यात आवश्यक बदल करण्याचे आधिकार विद्यापीठाचे असतील. तसेच आवश्यकता भासल्यास मूल्यांकन समितीच्या निर्णयानुसार निवडीसाठी आवश्यक ते थोडे बदल /सुधारणा करुन ते डिझाईन सुधारीत करुन देणे त्या स्पर्धकास बंधनकारक असेल.

७. इच्छुकांनी आपल्या प्रवेशिका (डिझाईन) दि.१०/८/२०२५ पर्यंत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागास सॉफ्टकॉपी CDR व PDF /JPEG / PNG (300 DPI) file आपले नाव / मोबाईल क्रमांक / ई-मेल व पत्ता इत्यादी माहितीसह dsw@bamu.ac.in या ई-मेलवर पाठवावी आणि डिझाईनची रंगीत हार्ड कॉपी **विद्यापीठ स्मृतिचिन्ह व चषक डिझाईन स्पर्धा प्रवेशिका, द्वारा - संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर-४३१००४** या पत्त्यावर पाठवणे अनिवार्य आहे. वेळेनंतर प्राप्त प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही, याची सर्वानी नोंद घ्यावी.

८. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी संपर्क क्र. ७५८८१६६७८८/९७३०४०८३७६ वर स्पर्धकांनी संपर्क करावा.

९. उपरोक्त स्पर्धेचे डिझाईन मौलिक असावे, कोणत्याही कॉपी राईटचे उल्लंघन झाल्यास स्पर्धक स्वत: जबाबदार राहील व त्या स्पर्धकास अपात्र ठरविण्यात येईल.

१०. स्पर्धकाने सहभाग नोंदविला याचा अर्थ त्याने वरील सर्व अटी स्वीकारल्या आहेत असे गृहीत धरले जाईल.

११. स्पर्धेतील निकालाविषयी परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील.

१२. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

१३. विजेत्या स्पर्धकांना विद्यापीठाच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात येईल, त्याविषयी विजेत्यांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल.

१४. विद्यापीठाला कोणतीही प्रवेशिका नाकारण्याचा किंवा स्पर्धा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार असेल.

१५. या स्पर्धेतील सर्व डिझाईन या विद्यापीठाच्या मालमत्ता ठरतील व त्या वापराविषयीचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राहतील.

विद्यापीठ प्रांगण,
छत्रपती संभाजीनगर.
संदर्भ क्र. : संविवि २०२५-२६/१८ जुलै २०२५/ 9247-9773

कुलसचिव